डाक नोंदणीने पोच देय

क्रमांक : नियुक्ती-११०८/संस/८२/प्रशा-२/
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन,
प्रशासकीय इमारत, मुंबई उपनगर जिल्हा,
८ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व),
मुंबई- ४०० ०५१.

दिनांक : १४ जुलै, २००८.

कार्यालयीन आदेश

अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या प्रसिध्द जाहिरातीच्या अनुषंगाने निवड प्रक्रियेअंती गट-ब (अराजपत्रित) मधील संशोधन सहायक पदासाठी नियुक्तीकरीता शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांपैकी खालील उमेदवारांची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयात संशोधन सहायक या रिक्त पदावर त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गातून वेतनश्रेणी रूपये ५५००-१७५-९००० मध्ये ते रुजू होतील त्या दिनांकापासून रुपये ५५००/- या मूळ वेतनावर एक वर्षाच्या परिवीक्षा कालावधीवर पुढील आदेश मिळेपर्यंत खाली नमूद केलेल्या सेवाशर्तीच्या अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्तीने पदस्थापना करण्यात येत आहे. त्यांना शासन नियमानुसार मूळ वेतनाव्यतिरिक्त इतर भत्ते ही अनुज्ञेय राहतील.

| अ.क्र | उमेदवाराचे नाव | नियुक्तीचा प्रवर्ग | ज्या कार्यालयात पदस्थापना करण्यात आली ते कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १) | श्रीमती मनीषा रमेश माने | खुला | अर्थ व सांख्यिकी संचालनालय (समन्वय शाखा), मुख्य कार्यालय, मुंबई. | रिक्त पदावर |
| २) | श्रीमती वैशाली मोहनराव सांळुखे | खुला | अर्थ व सांख्यिकी संचालनालय (रा.न.पा शाखा), मुख्य कार्यालय, मुंबई. | रिक्त पदावर |
| ३) | श्रीमती पुष्पा प्रमोद वक्ते | खुला | अर्थ व सांख्यिकी संचालनालय (रा.उ. शाखा), मुख्य कार्यालय, मुंबई. | रिक्त पदावर |
| ४) | श्री.लक्ष्मीकांत राजाराम थोन्टे | खुला | अर्थ व सांख्यिकी संचालनालय (इ.आ.सं.केंद्र ), मुख्य कार्यालय, मुंबई. | रिक्त पदावर |
| ५) | श्रीमती लुंबिनी जनार्दन सोनोने | खुला | अर्थ व सांख्यिकी संचालनालय (प्रशासकीय माहिती शाखा), मुख्य कार्यालय, मुंबई. | रिक्त पदावर |
| ६) | श्री.भरत पोपटराव साळुंके | खुला | अर्थ व सांख्यिकी संचालनालय (प्रकाशन शाखा), मुख्य कार्यालय, मुंबई. | रिक्त पदावर |
| ७) | श्रीमती स्मिता सुधाकर कुलकर्णी | खुला | अर्थ व सांख्यिकी संचालनालय (वा.उ.पा.शाखा), मुख्य कार्यालय, मुंबई. | रिक्त पदावर |

२..

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ८) | श्री.वसंत नाथा औटी | खुला | जिल्हा नियोजन समिती,<br>जिल्हाधिकारी कार्यालय,<br>रायगड-अलिबाग | रिक्त पदावर |
| ९) | श्री.रावसाहेब विक्रम लटपटे | खुला | अर्थ व सांख्यिकी संचालनालय<br>(रा.न.पा शाखा),<br>मुख्य कार्यालय, मुंबई. | रिक्त पदावर |
| १०) | श्री.राहुल आत्माराम इधे | भ.ज<br>(क) | जिल्हा सांख्यिकी कार्यालय,<br>नंदूरबार | रिक्त पदावर |
| ११) | श्री.संदीप श्रीराम भिमटे | अ.जा | जिल्हा नियोजन समिती,<br>जिल्हाधिकारी कार्यालय,<br>गडचिरोली | रिक्त पदावर |
| १२) | श्रीमती अनुश्री दिपक वानखडे | खुला<br>(महिला) | जिल्हा नियोजन समिती,<br>जिल्हाधिकारी कार्यालय,<br>अकोला | रिक्त पदावर |
| १३) | श्रीमती सीमा रमेश आर्दाळकर | खुला<br>(महिला) | जिल्हा सांख्यिकी कार्यालय,<br>सिंधुदूर्ग | रिक्त पदावर |
| १४) | श्रीमती प्रांजली प्रल्हादराव  निमकर | खुला<br>(महिला) | जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण<br>कार्यालय, नागपूर | रिक्त पदावर |
| १५) | श्रीमती धनश्री आनंद ठोसर | खुला<br>(महिला) | अर्थ व सांख्यिकी संचालनालय<br>(रा.उ. शाखा),<br>मुख्य कार्यालय, मुंबई. | रिक्त पदावर |
| १६) | श्रीमती मनिषा आत्माराम पाटील | खुला<br>(महिला) | अर्थ व सांख्यिकी संचालनालय<br>(इ.आ.सं.केंद्र ),<br>मुख्य कार्यालय, मुंबई. | रिक्त पदावर |
| १७) | श्रीमती उज्वला धनंजय पांडे | इमाव<br>(महिला) | जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण<br>कार्यालय, वर्धा | रिक्त पदावर |
| १८) | श्री.वामन प्रभू जाधव | वि.जा<br>(अ) | जिल्हा सांख्यिकी कार्यालय,<br>नांदेड | रिक्त पदावर |
| १९) | श्रीमती मंगला यशवंत शिंदे | अ.ज. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,<br>शहापूर, जिल्हा-ठाणे | रिक्त पदावर |
| २०) | श्री.संजय मोहनसिंग राठोड | वि.जा<br>(अ) | जिल्हा नियोजन समिती,<br>जिल्हाधिकारी कार्यालय,<br>बुलढाणा | रिक्त पदावर |
| २१) | श्रीमती उषा रंगनाथ गोतरणे | अ.ज<br>(महिला) | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,<br>यावल, जिल्हा-जळगांव | रिक्त पदावर |

## “ सेवाशर्ती ”

१) सदर नियुक्ती एक वर्षाच्या परिविक्षा कालावधीवर असेल. परिवीक्षाधीन कालावधीत कर्मचा-याने कामाचा अपेक्षित दर्जा प्राप्त न केल्यास, त्याचे काम किंवा वर्तणूक अयोग्य अथवा अननुरुप आढळल्यास तो/ती सेवेतून कमी करण्यास पात्र ठरेल.

२) प्रस्तुत उमेदवारांची नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात पुढील आदेश होईपर्यंत करण्यात येत असून त्यांची सेवासमाप्ती कोणतीही पूर्व सूचना न देता करण्यात येईल. विभागीय चौकशी नियम पुस्तिका १९९१ मधील नियम क्रमांक ३.९(३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे हमीपत्र रूजू होताना लिहून द्यावे लागेल.

३) जर त्यांना नोकरी सोडावयाची असेल तर त्यांनी एक महिन्यापेक्षा कमी नाही इतक्या दिवसांची आगाऊ लेखी सूचना द्यावी अन्यथा त्यांना त्यांच्या एक महिन्याच्या मूळ वेतनाएवढी रक्कम सरकार जमा करावी लागेल.

४) सदरची नेमणूक वैद्यकीय तपासणीमध्ये शारिरीकदृष्टया पात्र असण्याच्या प्रमाणपत्रावर अवलंबून राहील.

५) जर सूट मिळू शकत नसेल तर त्यांना एतदर्थ मंडळाच्या विहित हिंदी व मराठी भाषा परीक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण व्हावी लागेल. यासंदर्भात त्यांनी स्वतंत्रपणे अर्ज संचालनालयाकडे सादर करावा.

६) सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक:प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.५/२००१/३९, दिनांक २० जुलै, २००२ व क्रमांक : प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९ मार्च, २००३ मधील तरतुदीनुसार त्यांनी संगणक हाताळणीविषयक खाली नमूद केलेली प्रमाणपत्रे नियुक्ती स्विकारण्याच्या वेळेस त्यांच्याकडे उपलब्ध नसल्यास नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करून कार्यालय प्रमुखामार्फत अर्थ व सांख्यिकी संचालनालयास सादर करावे. अन्यथा हा कालावधी संपताच त्यांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. या कालावधीनंतर त्यांचे कोणतेही निवेदन/अभिवेदन विचारात घेतले जाणार नाही अथवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिली जाणार नाही अथवा परीक्षा उत्तीर्ण होण्यास मुदतवाढ दिली जाणार नाही.

अ) **“DOEACC”** सोसायटीच्या अधिकृत **“CCC”** किंवा **“O”** स्तर किंवा **“A”** स्तर किंवा **“B”** स्तर किंवा **“C”** स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र

किंवा

ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत **“MS-CIT”**परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

७) वरील उमेदवारांची नियुक्ती दिनांक १/११/२००५ नंतरची असल्याने त्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना [म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४] आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

८) संचालनालयाची पदे राज्यस्तरीय असल्याने ते राज्यात संचालनालयाच्या अधिनस्त कोणत्याही कार्यालयात नियुक्ती/लोकहितास्तव बदलीस पात्र राहतील.

९) वरील उमेदवारांना महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील तरतुदीनुसार विहित नमुना-अ मधील प्रतिज्ञापन सादर करावे लागेल.

१०) वरील गोष्टींना मान्यता दिल्यानंतर त्यांना नोकरनाम्यावर तसेच निष्ठा शपथेवर स्वाक्षरी करावी लागेल.

३/- वरील उमेदवारांनी पदस्थापनेच्या पदावर या आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत रुजू व्हावे. या कालावधीत ते रुजू न झाल्यास त्यांचे संशोधन सहायक पदावरील नियुक्तीचे आदेश रद्द समजण्यात येतील.

४/- कार्यालयात रुजू होते वेळी त्यांनी संबंधित कार्यालय प्रमुखास खालील प्रमाणपत्रांच्या मूळ व साक्षांकित प्रती सादर कराव्यात.

(अ) शैक्षणिक पात्रता (पदवी व पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा शासनाने मान्य केलेल्या तत्सम परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र व गुणपत्रक)

(ब) वयाचा पुरावा (जन्मतारखेचा मूळ दाखला किंवा माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र किंवा शाळा सोडल्याचे प्रमाणप्रत्र)

(क) मागासवर्गीय उमेदवारांच्याबाबतीत सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र व संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेले जाती वैधता प्रमाणपत्र.

(ड) इतर मागास वर्ग, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब) (क) व (ड ), विशेष मागास प्रवर्ग आणि खुला (महिला) या प्रवर्गातील उमेदवार असल्यास ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे "नॉन क्रिमीलेअर" प्रमाणपत्र.

(इ) महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र.

(ई) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबांचे प्रतिज्ञापन) नियम २००५ नुसार विहित केलेले नमुना-अ मधील प्रतिज्ञापन

(उ) विभागीय चौकशी नियम पुस्तिका १९९१ मधील नियम क्रमांक ३.९(३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे हमीपत्र.

५/- रुजू होण्यासाठी त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता दिला जाणार नाही.

६/- अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या प्रसिध्द जाहिरातीच्या अनुषंगाने निवड प्रक्रियेअंती संशोधन सहायक पदाकरीता शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांपैकी काही उमेदवारांची जात प्रमाणपत्र पडताळणी झाली नसल्याने सदर उमेदवारांच्या नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे या आदेशातील उमेदवारांची ज्येष्ठता निवड यादीनुसार यथावकाश निश्चित करण्यात येईल.

७/- संबंधित कार्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, संबंधित उमेदवारास रुजू करुन घेण्यापूर्वी या आदेशासोबत जोडलेल्या संशोधन सहायक पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार ते संशोधन सहायक पदासाठी असलेली शैक्षणिक पात्रता, वय तसेच इतर विहित अटी पूर्ण करतात किंवा कसे हे उमेदवारांनी सादर केलेल्या मूळ प्रमाणपत्रावरुन तपासावे व त्यानंतरच त्यांना रुजू करुन घ्यावे.

८/- संबंधित कार्यालयप्रमुखांनी उमेदवार रूजू झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

(द.रा.भोसले)
अर्थ व सांख्यिकी संचालक,
मुंबई.

प्रति,

--------------------------------------

--------------------------------------

--------------------------------------

प्रत : माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
२. कार्यासन अधिकारी, नियोजन विभाग (का.१४२६), मंत्रालय, मुंबई
३. जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग/अकोला/बुलढाणा/गडचिरोली
४. सहसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय (सर्व)
५. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, वर्धा/नागपूर

..५/-

६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग/ अकोला/गडचिरोली/बुलढाणा
८. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर, जिल्हा ठाणे/यावल, जिल्हा-जळगांव
९. जिल्हा सांख्यिकी अधिकारी, सिंधदुर्ग/नंदूरबार/नांदेड
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, रायगड-अलिबाग/सिंधुदूर्ग/नंदूरबार/नांदेड/वर्धा/बुलढाणा/ गडचिरोली/अकोला/नागपूर
११. उप कोषागार अधिकारी, शहापूर, जिल्हा-ठाणे/यावल, जिल्हा-जळगांव

प्रत :

| | | |
|---|---|---|
| १. अपर संचालक (सर्व) | [] | |
| २. सहसंचालक (सर्व) | [] | |
| ३. समन्वय/रा.न.पा/रा.उ/इआसंकें शाखा | [] | अर्थ व सांख्यिकी संचालनालय, |
| ४. प्र.मा/प्रकाशन/वा.उ.पा | [] | मुख्य कार्यालय, मुंबई. |
| ५. प्रशासन शाखा-१/२/३/४ | [] | |
| ६. ज्येष्ठतासूची कार्यासन [प्रशासन-२] | [] | |
| ७. सेवापुस्तक कार्यासन [प्रशासन-४] | [] | |